**प्रश्नावली**

**१.ई हक्क प्रणाली काय आहे?**

कोणत्याही खातेदाराला / संबंधित व्यक्तीला तलाठी कार्यालयाकडे वेगवेगळ्या हक्काच्या नोंदी ७/१२ वर फेरफार च्या स्वरुपात घेण्यासाठी जे अर्ज करावे लागतात ते अर्ज ऑनलाईन पद्धतीने तलाठी कार्यालयात न जाता घरी बसून दाखल करता येतील.हि प्रणाली म्हणजे ई हक्क होय.

**२.कोणकोणत्या फेरफार प्रकारासाठी अर्ज दाखल करता येतील?**

यामध्ये सध्या पहिल्या टप्प्यात १. वारस नोंद २. बोजा दाखल करणे ३. बोजा कमी करणे ४. ई करार नोंदी ५. मयताचे नाव कमी करणे ६. अज्ञान पालनकर्ता याचे नाव (अ.पा.क.) कमी करणे ७. एकत्र कुटुंब पुढारी/मॅनेजर (ए.कु.मॅ.) चे नाव कमी करणे ८. विश्वास्थांचे नाव कमी करणे आणि ९. संगणीकृत गाव नमुना सात-बारा मधील चूक दुरुस्त करण्यासाठी अर्ज सादर करणे. अशा नऊ प्रकारच्या फेरफार नोंदीसाठी अर्ज सादर करता येतील.

**३.सदर अर्ज दाखल करताना अर्ज भरण्यासाठी डेटा एन्ट्री बाबत काही महत्वाच्या सूचना आहेत काय?**

आपल्याला एकाच इंग्रजी कि-बोर्डच्या सहाय्याने इंग्रजी आणि मराठी दोन्ही भाषेत माहिती भरता येईल. नावावरुन खाते शोधणे ह्या फिल्ड मधील नावे देवनागरी लिपीतच असणे आवश्यक आहे. देवनागरी मधे माहिती भरावयाची असेल तर नावाचे इंग्रजी स्पेलींग टाईप करावे आणि नंतर स्पेस बार द्यावा टाईप केलेला इंग्रजी शब्द मराठीत दिसेल. इंग्रजी नाव टाईप केल्यानंतर स्पेस बार देणे अनिवार्य आहे. तसेच नावामध्ये काहीही दुरुस्ती असेल ती स्पेस बार देण्यापूर्वी करावी स्पेसबार दाबल्यानंतर दुरुस्ती करण्याकरीता संपूर्ण शब्द खोडून पुन्हा टाईप करावे लागेल. मराठी नाव भरल्यानंतर त्या नावाचे इंग्रजी स्पेलिंग इंग्रजी नावात आपोआप येईल. आपल्याला इंग्रजी नाव पुन्हा टाईप करावे लागणार नाही.

**४.इकरार म्हणजे काय?**

इकरार' या शब्दाचा अर्थ 'संमती देणे (Consent), असा होतो. एखाद्या सहकारी संस्थेचा सभासद असलेला कोणीही खातेदार, स्वत:च्या जमिनीवर एखाद्या सहकारी विकास संस्थेककडून किंवा सहकारी बँकेकडून, शेतीच्या विकासासाठी कर्ज घेतो तेव्हा महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६० मधील नमुना ‘ल’ मध्ये त्याची संमती घेऊन, महाराष्ट्र  सहकारी संस्था नियम १९६० मधील नियम ४८(५) अन्वये, अशा व्यवहाराची नोंद गाव नमुना ७-१२ च्या इतर हक्कात नोंदविण्यात येते.

**५. इकरार करिता अर्ज दाखल करताना कोण कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत.**

इकरार नोंदीसाठी अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे-

१. अर्जदाराचा फोटो असणारे ओळखपत्र

२. वित्तीय संस्थेसोबत केलेल्या  इकरार दस्तामची प्रत

**६. बोजा दाखल करणे म्हणजे काय आणि सदर अर्ज कोण दाखल करू शकतो?**

खातेदारामार्फत जे कर्ज घेतले जाते त्याची नोंद गाव नमुना सात-बाराच्या 'इतर हक्कात' नोंदवली जाते त्याला 'बोजा दाखल करणे' असे म्हणतात. 'बोजा दाखल' करण्यारसाठी खातेदार स्वतः ऑनलाईन अर्ज सादर करु शकतात किंवा तलाठीकडे अर्ज सादर करू शकतात अथवा ज्या बँक/वित्तीय संस्थुेकडून कर्ज घेतले आहे ती बँक देखील 'बोजा दाखल' करण्यासची कार्यवाही करु शकते.

**७. बोजा दाखल करण्यासाठी कोण कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत.**

कर्ज किंवा गहाणखताचा बोजा दाखल करण्यासाठी खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे-

१. बँक/वित्तीय संस्थेयच्या कर्ज मंजुरी पत्राची प्रत

२. गहाणखत बोजा दाखल करण्याजसाठी, दुय्यम निबंधक यांच्याकडे नोंदणीकृत केलेल्या गहाणखताची प्रत.

**८. बोजा कमी करणे म्हणजे काय?**

बँक/वित्तीय संस्थेककडून घेतलेले ज्यावेळी खातेदार पूर्णपणे अदा करतात त्यावेळी, त्याठ खातेदाराच्याव गाव नमुना सात-बाराच्याव 'इतर हक्कात' नोदवलेली 'बोजा'ची नोंद कमी होणे आवश्यक असते. 'बोजा'ची नोंद कमी करण्या-साठी खातेदार स्वतः ऑनलाईन अर्ज सादर करु शकतात किंवा तलाठीकडे अर्ज सादर करू शकतात अथवा ज्या बँक/वित्तीय संस्थेवकडून कर्ज घेतले आहे ती बँक देखील 'बोजा दाखल' करण्यातची कार्यवाही करु शकते.

**९. बोजा'ची नोंद कमी करण्यारसाठी कोण कोणती कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे ?**

बोजा'ची नोंद कमी करण्यासाठी खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे-

१. कर्ज पूर्णपणे अदा केले असल्याबाबत बँक/वित्तीय संस्थेच्या पत्राची प्रत

२. अर्जदाराचा फोटो असणारे ओळखपत्र

**१०. वारस नोंद म्हणजे काय?**

खातेदार मयत झाल्यानंतर त्याच्या वडिलोपार्जित किंवा स्वकष्टार्जित मालमत्तेवर, खातेदाराला लागू असलेल्या वैयक्तिक कायद्यान्वये त्याच्या कायदेशीर वारसांची नावे महसूल अभिलेखात दाखल केली जातात.

**११. वारस नोंदीसाठी कोण कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत?**

वारस नोंदीसाठी खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे –

१. मूळ किंवा प्रमाणीत मृत्यु दाखला

२. सर्व वारसांच्याप वयाच्या पुराव्याची साक्षांकीत प्रत

३. सर्व वारसांच्या आधार कार्डची स्व साक्षांकीत प्रत

४. वारसांबाबत विहित नमुन्यायतील शपथपत्र-स्वतयंघोषणापत्र

५. अर्जातील सर्व वारसांबाबत पत्ता, भ्रमण ध्वनी यांचा पुराव्यासह तपशील.

६. परदेशस्थ  वारसाचा इ-मेल व पत्ता याचा पुरावा

७. शिधापत्रिकेची स्व सांक्षांकीत प्रत (असल्यास)

**१२. मयत खातेदाराचे नाव कमी करणे साठी अर्ज कधी आणि का दाखल करावा लागतो?**

एखाद्या जमिनीच्या गाव नमुना सात-बारा सदरी नावे असलेल्या खातेदारांपैकी एखादा खातेदार मयत झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसांची नावे गाव नमुना सात-बारा सदरी दाखल झालेली असतात. अशा वारस खातेदारांपैकी एखादा खातेदार मयत झाल्यास, आणि अन्य  वारसांची नावे आधीच अभिलेखात दाखल असल्यास, फक्त त्या मयत खातेदाराचेच नाव गाव नमुना सात-बारावरून कमी करणे आवश्यक ठरते.  त्यामुळे फक्त मयत व्यक्तीचे नाव कमी करण्याकरीता अर्ज करावा लागतो.

**१३. मयत खातेदाराचे नाव कमी करण्याकरिता कोण कोणती  कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे?**

मयत खातेदाराचे नाव कमी करण्याकरिता खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे -

१. मयत खातेदाराचा मूळ किंवा प्रमाणित मृत्यु दाखला

२. आधी वारस नोंद झालेल्या फेरफारची नक्कल

३. हयात वारसांच्या वयाच्या  पुराव्याची साक्षांकीत प्रत

४. सर्व हयात वारसांच्या  आधार कार्डची स्वसाक्षांकीत प्रत

५. वारसांबाबत विहित नमुन्यातील शपथपत्र/स्वंयंघोषणापत्र

६. अर्जातील सर्व वारसांबाबत पत्ता, दुरध्वनी/भ्रमण ध्वनी यांचा पुराव्यासह तपशील.

७. परदेशस्थ  वारसाचा (असल्यास) इ-मेल व पत्ता याचा पुरावा

**१४. अ.पा.क. ची नोंद कमी करणे म्हणजे काय?**

एखाद्या अज्ञान (१८ वर्षांपेक्षा कमी) व्याक्तीच्या  नावे एखादी मालमत्ता खरेदी केली जाते तेव्हा  त्या् अज्ञान व्यक्तींच्या सोबत 'अ.पा.क.' (अज्ञान पालक कर्ता) म्हणून त्याच्यार सज्ञान नातेवाईकाचे नाव गाव नमुना सात-बारावर दाखल करण्यात येते कारण अज्ञान व्यक्तीला कोणताही व्यवहार करण्यारची परवानगी कायदा देत नाही.

अशा अज्ञान व्यक्तीचे वय जेव्हा १८ वर्षे पेक्षा जास्ते होते तेव्हाक त्याचे नाव खातेदार म्हणून गाव नमुना सात-बारा सदरी दाखल करता येते आणि अज्ञान पालक कर्ता म्हणून नाव दाखल असलेल्या व्यक्तिचे गाव नमुना सात-बारा वरुन कमी करण्यात येते. याला 'अ.पा.क. ची नोंद कमी करणे ' असे म्हणतात.

**१५. अ.पा.क. ची नोंद कमी करण्या्साठी कोण कोणती  कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे ?**

अ.पा.क. ची नोंद कमी करण्या्साठी खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे -

१. मूळ खरेदी दस्ताची (अज्ञानाच्या नावे खरेदी केल्याची) साक्षांकीत प्रत

२. अ.पा.क. दाखल असलेल्या् फेरफारची नक्कल

३. अ.पा.क. दाखल असलेल्या गा.न. ७-१२ ची नक्कल

६. अर्जदाराच्या् आधार कार्डची स्वसाक्षांकीत प्रत

७. अज्ञान व्यक्ती सज्ञान झाल्यालचा पुरावा- साक्षांकीत प्रत

८. सर्व हितसंबंधितांचे रहिवास पत्ते

**१६. ए.कु.मॅ. नोंद म्हणजे काय?**

हिंदू एकत्र कुटुंबाच्या नावे एखादी मालमत्ता खरेदी केली असल्यास, हिंदू एकत्र कुटुंबाच्या सर्व सदस्यांची नावे गाव नमुना सात-बारा सदरी दाखल करण्या ऐवजी, त्या हिंदू एकत्र कुटुंबाचा कर्ता किंवा मुख्य पुरूष याचे नाव ए.कु.मॅ. ('एकत्र कुटुंब मॅनेजर) किंवा ए.कु.क. (एकत्र कुटुंब कर्ता) म्हणून गाव नमुना सात-बारा सदरी दाखल करण्यात येत असे.

**१७. ए. कु.मॅ. ची नोंद कमी करण्यासाठी कोण कोणती कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे ?**

ए. कु.मॅ. ची नोंद कमी करून, हिंदू एकत्र कुटुंबाच्याब सर्व सदस्यांची नावे गाव नमुना सात-बारा सदरी दाखल करण्यासाठी खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे –

१. मूळ खरेदी दस्ताची (ए.कु.मॅ./ए.कु.क.च्या नावे खरेदी केल्याची) साक्षांकीत प्रत

२. ए.कु.मॅ./ए.कु.क. दाखल असलेल्याब फेरफारची नक्कल

३. ए.कु.मॅ./ए.कु.क. दाखल असलेल्याब गा.न. सात-बाराची नक्कल

४. चालू गाव नमुना सात-बारा उतार्याची नक्काल

६. अर्जदारांच्या आधार कार्डची स्वसाक्षांकीत प्रत

७. एकत्र कुटुंब विभक्त झाल्याबाबतचे संयुक्त प्रतिज्ञापत्र

८. ए.कु.मॅ./ए.कु.क. म्हणुन नाव दाखल असलेल्या् व्यतक्तीचा, त्यात ए.कु.मॅ./ए.कु.क. म्हणून दाखल असलेले नाव कमी करण्यासाठी ना हरकत दाखला.

**१८. विश्वस्तांचे नाव बदलण्यासाठी कोण कोणती कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे?**

एखाद्या नोंदणीकृत धर्मादाय / सामाजिक / सहकारी संस्थेमध्ये 'विश्वस्त' म्हणून दाखल असलेले नाव बदलण्यासाठी खालील कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे

१. विश्वस्त संस्थेच्या नावे असलेल्या गाव नमुना सात-बारा ची प्रत

२. विश्वस्त संस्थेच्या सदस्यांची नावे दाखल झालेला फेरफार नोंदीचा उतारा

३. अर्जदाराचे संपूर्ण नाव

४. अर्जदाराचा मोबाईल नंबर

५. अर्जदाराचा इ-मेल आय डी (असल्यास)

५. विश्वस्तांचे नाव बदलण्याबाबत संबंधीत संस्थेच्या ठरावाची प्रत

६. धर्मदाय आयुक्त यांचा आदेश/ना हाकत दाखला

**१९. ई हक्क प्रणालीत फेरफार अर्ज सदर करताना कागदपत्रे जोडताना त्यांची फाईल प्रकार आणि साईझ किती आहे?**

ई हक्क प्रणालीत  मध्ये कागदपत्रे जोडताना त्यांची फाईल हि PDE स्वरुपात असावी आणि प्रत्येक फाईल ची मर्यादा 300 kb पर्यंत आहे.

**२०. ई हक्क प्रणालीत दाखल केलेला अर्जाची सद्यस्थिती कशी समजेल?**

ई हक्क प्रणालीत आपण अर्ज दाखल करताना जो नोंदणीकृत मोबाईल क्रमांक द्याल त्या मोबाईल क्रमांकावर अर्ज खालील टप्प्यावर मेसेज प्राप्त होईल

अ. आपला अर्ज आपल्या  गावाचे तलाठी यांचेकडे  कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्यावर.
आ. आपला अर्जात जर काही त्रुटी असेल तर तलाठी यांचेकडून त्रुटी  पूर्ततेसाठी परत करण्यात आल्यावर
इ. आपण केलेला अर्ज तलाठी यांचेकडील तपासणी मध्ये परिपूर्ण आढळल्यास  फेरफार क्रमांक संबंधित गावात नोंदविण्यात आलेला मेसेज
वरील मेसेज वरून आपणास आपल्या अर्जाची सद्यस्थिती समजेल.

**२१.ई हक्क प्रणाली मध्ये कोण कोण अर्ज सादर करू शकतील?**

ई हक्क प्रणालीमध्ये खातेदार/नागरिक,बँक प्रतिनिधी,सोसायटीचे सचिव आणि तलाठी अर्ज दाखल करू शकणार आहेत.

**२२. ई-हक्क या प्रणालीत अर्ज दाखल करण्यासाठी कोठे लोगिन करावे?**

ई-हक्क या प्रणालीत अर्ज दाखल करण्यासाठी https://pdeigr.maharashtra.gov.in/Helpfile.aspx या वेबसाईट वर लोगिन करावे.

**२३. ई-हक्क या प्रणालीत अर्ज दाखल करण्यासाठी नवीन लोगिन कसे तयार करावे आणि त्यासाठी काय माहिती आवश्यक आहे?**

https://pdeigr.maharashtra.gov.in/Helpfile.aspx या संकेतस्थळावर create new user account या बटणावर जावून नोंदणी करावी लागेल व त्यासाठी आपले पूर्ण नाव, पत्ता, मोबाइल नंबर, ई मेल आयडी, PAN कार्ड नंबर इत्यादी माहिती द्यावी लागेल व आपला युजर आय डी व पासवर्ड एकदा तयार करावा लागेल.तयार केलेला युजर आयडी व पासवर्ड जतन करून ठेवावा लागेल व तो प्रत्येकवेळी लॉगीन करण्यासाठी वापरावा लागेल.

**२४.ई हक्क प्रणालीतून अर्ज दाखल केल्यावर आपण भरलेल्या अर्जाची प्रत किंवा पोहोच कोठून मिळेल?**

ई हक्क प्रणालीत संपूर्ण अर्ज भरून झाल्यानंतर अर्ज साठवा केल्यानंतर अर्जाची प्रत हा पर्याय ओपेन होईल. अर्जाची प्रत पाहण्यासाठी आपल्या browser चे pop up enable (allow) असल्याची खात्री करावी त्याबाबतचा संदेश सदर पेज वर देण्यात आलेला आहे. सदर अर्जाच्या प्रतीबरोबर नमुना ७ मध्ये अर्जाची पोहोच देखील देण्यात आलेली आहे.

**२५. अर्जाची पोहोच वर तलाठी स्वाक्षरीची गरज असणार का?**

सदर पोहोच आज्ञावली मधून प्राप्त झाल्याने त्यावर स्वाक्षरीची गरज असणार नाही.

**२६. ई हक्क  प्रणालीमध्ये नवीन अर्ज दाखल करण्यासाठी कोठे जावे?**

ई हक्क प्रणालीमध्ये नवीन अर्ज दाखल करण्याकरिता "नवीन अर्ज" या बटणावर जावे.

**२७.आपण यापूर्वी दाखल केलेले अर्ज कोणत्या tab मध्ये पाहता येतील.**

पूर्वी दाखल केलेले अर्ज"पूर्वी सादर केलेले अर्ज" या tab मध्ये उपलब्ध होतील.

**२८.काही कारणास्तव साठवा न झालेले व अर्धवट भरलेले अर्ज पुन्हा संपादित करण्यासाठी कोठे उपलब्ध होतील?**

काही कारणास्तव साठवा न झालेले अर्ज पुन्हा संपादित करण्यासाठी "अर्जाचा मसुदा"  या tab  मध्ये उपलब्ध होतील
.

**२९.तलाठी यांनी त्रुटी पूर्ततेसाठी पुन्हा माघारी पाठवलेला अर्ज दुरुस्तीसाठी कोठे उपलब्ध होईल?**

तलाठी यांनी त्रुटी पूर्ततेसाठी पुन्हा माघारी पाठवलेला अर्ज दुरुस्तीसाठी "अर्ज दुरुस्ती" या tab मध्ये उपलब्ध होईल.